MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

# विद्यावार्ता™

July To Sept. 2022
Issue 43, Vol-03

Date of Publication
01 July 2022

Editor
Dr. Bapu g. Gholap
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

विद्येविना मति गेली, मतीविना नीति गेली
नीतिविना गति गेली, गतिविना वित्त गेले
वित्तविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले

-महात्मा ज्योतीराव फुले

❖ विद्यावार्ता या आंतरविद्याशाखीय बहूभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायक्षेत्र:बीड

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat**.

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205
Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

26) Vocational Education and Students of B. Ed.
**Maharani Soren, Darbhanga & Dr. Absarul Haque , Darbhanga** ||112

27) Study of yoga teaching on value system and behaviour patterns of young....
**Rahul Sharma , Dr. Neelam Singh, Bhopal** ||118

28) भारतीय खाण क्षेत्र आणि त्याचे पर्यावरणावर व मानवी आरोग्यावर होणारे परिणाम
**प्रा. डॉ. नागेश मोहनराव सूर्यवंशी, परेल, मुंबई** ||122

29) समाजाला दिशा देणारे – राष्ट्रसंत भगवान बाबा...
**प्रा. डॉ. अनिल बळीराम बांगर, पेझारी, जि. रायगड.** ||129

30) प्राचीन मराठीवाङ्मयातील चरित्र : आशयसूत्र व वाटचाल –वाङ्मयीन शोध
**डॉ. आप्पा दत्तू माने, मिरजगाव, जि. अहमदनगर** ||134

31) राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा सामाजिक दृष्टीकोन
**प्रा. डॉ. हिरालाल मेश्राम, नागपूर** ||138

32) गांधी का राष्ट्रवाद
**डॉ. जितेन्द्र कुमार सोनी, जयपुर (राजस्थान)** ||141

33) रूस यूक्रेन के मध्य साइबर वार
**डॉ अतुल चंद, बलुवाकोट** ||148

34) भारतीय हिंदी सिनेमा और सामाजिक चेतना
**डॉ सुमन** ||151

35) राजेन्द्र यादव की कहानियों में चित्रित जीवनबोध
**डॉ. राम पाण्डेय, महराजगंज** ||154

36) सार्वजनिक क्षेत्र की बीमा कम्पनी और निजी क्षेत्र की बीमा कम्पनियों के....
**डॉ. सपना सोनी, संदीप सोनी, इंदौर** ||158

37) महिलाओं के संवैधानिक एवं कानूनी संरक्षण हेतु प्रावधान
**सावल राम, जोधपुर, राजस्थान** ||162

38) मैं पायल : तीसरे लिंग का अभिशप्त जीवन
**प्राचार्य डॉ. विलास कांबळे, शिरूर (ता.) ता. अहमदपूर जि. लातूर** ||167

www.vidyawarta.com/03 — http://www.printingarea.blogspot.com

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318 | Vidyawarta® Peer-Reviewed International Journal | July To Sept. 2022 Issue-43, Vol-03 | 0129

29

# समाजाला दिशा देणारे — राष्ट्रसंत भगवान बाबा...

प्रा. डॉ. अनिल बळीराम बांगर
मराठी विभाग प्रमुख
को. ए. सो. लक्ष्मी—शालिनी
महिला महाविद्यालय—पेझारी, ता. अलिबाग जि. रायगड.

**********

**प्रास्ताविक**

राष्ट्रसंत भगवानबाबांनी महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात कीर्तनाच्या माध्यमातून शैक्षणिक, सामाजिक, नैतिक व सांस्कृतिक प्रबोधन केले. भक्तिमार्ग, कर्ममार्ग व ज्ञानमार्ग यांचा त्रिवेणी समन्वय त्यांनी साधला होता. आपल्या कीर्तनांतून ते जातिभेद, धर्मभेद, अज्ञान, अंधश्रद्धा, अनिष्ट रुढी—परंपरा यांच्यावर प्रहार करीत. प्रबोधन कार्यासाठी,त्यांनी तेलंगणा, आंध्रप्रदेश, कर्नाटकातील काही भागासह उभा महाराष्ट्र पिंजून काढला. विठूनामाचा प्रचार ,प्रसार करतानाच त्यांनी समता, बंधुता, एकता, मानवता यांसारख्या आधुनिक विचारांचा समग्र आयुष्यभर प्रचार केला. त्यामुळेच वारकरी धर्माला आधुनिक रूप देणारे संत भगवानबाबा म्हणून त्यांना ओळखले जाते.

**'संत भगवानबाबा घराण्याची पूर्वपीठिका'**

भगवानबाबा महाराष्ट्रातील वंजारी जातीत जन्मले होते. त्यांच्या आईचे नाव कौतिकाबाई आणि वडिलांचे नाव तुबाजीराव सानप होते. तुबाजीराव सानप यांच्या घरात पाटीलकी होती, म्हणून ते आडनावाच्या पाठीमागे पाटील असे उपनाम लावीत. घराण्यात अनेक पिढ्यांपासून विठ्ठलभक्ती आणि पंढरपूरची वारी होती. त्यांच्या घराण्याचे मूळ गाव नगर जिल्ह्यातील शिकरडीपारडी होय पण त्यांचे पूर्वज बीड जिल्ह्यातील पाटोदा तालुक्यांतल्या सुपे घाट सावरगाव या गावी स्थायिक झाले होते.

**'जन्म आणि बालपण'**

बीड जिल्ह्यातील पाटोदा तालुक्यांतल्या सुपे घाट सावरगाव येथे श्रावण वद्य पाच शके १८१९ (२९ जुलै, इ.स. १८९६), सोमवार रोजी सूर्योदयाच्या समयी भगवानबाबांचा जन्म झाला. बारशाच्यावेळी मुलाचे नाव आबा किंवा आबाजी ठेवण्यात आले. त्यामुळे भगवानबाबांचे पूर्ण नाव आबाजी तुबाजी सानप. ते कौतिकाबाई आणि तुबाजीराव यांचे पाचवे अपत्य होते.गावात चौथीपर्यंत शाळा होती. तेव्हा गुरुजींच्या सांगण्यावरुन पुढील शिक्षणासाठी त्यांना त्यांच्या मामाच्या गावी लोणी, ता. शिरूर, जि. बीड येथे पाठवले गेले. अधिक शिक्षण सोयी नसल्याने आबाजी पुन्हा गावाकडे परत आला. ग्रामीण भागात रीतीरिवाजानुसार गुरेढोरे राखायला जात. आबाजीला शेती व गुरांची निगराणी राखायला फार आवडत असे. घरात धार्मिक वातावरण असल्यामुळे उपजतच आबाजीला आध्यात्मिक ज्ञानाची व विठ्ठलनामाची आवड निर्माण झाली. आबाजी घरी शेतीकाम सांभाळून विठ्ठलभक्ती करीत असे. त्यांनी पंढरपुर दिंडीस जाण्यास सुरुवात केली. दिघुळ येथील प्रख्यात वारकरी गितेबाबा यांच्या सोबत प्रथम दिंडीस गेले. पंढरपूरच्या विठ्ठलाचे दर्शन झाले तर जीवनाचे कल्याण होते अशी त्यांच्या परिवारात आणि आसपासच्या समाजात समजूत असल्याने त्यांनी गीतेबाबा दिघुळकरांसोबत पंढरपूरची वारी केली. त्यासाठी ते वयाच्या ५—६व्या वर्षी घर सोडून पायी चालत पंढरपूरला गेले. पहिल्या वारीच्या शेवटीच पंढरपुरात पोहोचल्यावर त्यांनी संपूर्ण जीवन विठ्ठलचरणी अर्पण करण्याचे ठरविले. त्यांनी गीतेबाबानाच आध्यात्मिक गुरू मानले. पंढरपूरच्या वारीवरुन गावी परतल्यावर आबाजी घरी परत गेला नाही. गावातील हनुमान मंदिरात जाऊन बसला. घरच्यांना ही बातमी कळताच ते मंदिरात आले. तेव्हा लहान आबाजीने तुळशीमाळ घालण्यासाठी आग्रह केला. लहान आबाजीचे भगवंताविषयी असलेले प्रेम पाहून घरच्यांनी आग्रह स्वीकारला आणि नंतर आबाजी घरी परत आला.

आबाजीचे पूर्वज हे लहानपणापासून नारायणगडाचे उपासक होते. नारायणगडाचे महंत हे त्यांचे वंशपरंपरागत गुरू होते. तत्कालीन नारायणगडाच्या गादीवर माणिकबाबा होते. आबाजीचे आईवडील नेमाने माणिकबाबाच्या दर्शनासाठी नारायणगडावर येत. एकदा

आबाजीचे आईवडील त्याला घेऊन विजयादशमीच्या दिवशी नारायणगडावर आले. आबाजीने माणिकबाबांना गुरूपदेश द्या असे म्हटले. त्यावर अल्पवयात गुरूपदेश देता येत नाही असे माणिकबाबा म्हणाले, पण आबाजीच्या मनाचे समाधान झाले नाही. माणिकबाबांनी घेतलेल्या शिष्यत्वाच्या परीक्षेत आबाजी उत्तीर्ण झाले म्हणून माणिकबाबांनी आबाजीला अनुग्रह दिला आणि गुरूपदेश केला. नंतर माणिकबाबांनी आबाजीचे नाव भगवान ठेवले.

असे सांगितले जाते की पंढरपुरला गेल्यानंतर तेथेच त्यांची भेट नारायणगड येथील माणिकबाबांशी झाली व ते सांप्रदायिक शिक्षणासाठी नारायणगडी गेले. माणिकबाबा हे त्यांचे गुरू होय. त्यानंतर भगवानबाबा पुढील शिक्षणासाठी आळंदीतील ह.भ.प. श्री बंकटस्वामी यांच्याकडे गेले. त्यानंतर ते पुन्हा नारायणगडावर आले. त्यावेळी भगवानबाबांचे वय ह्यध वर्षे होते. त्यानंतर भगवानबाबा नारायणगडाचे महंत झाले व त्यांनी तेथे वारी, नारळी सप्ताह असे अनेक धार्मिक कार्यक्रम राबवले.एकदा श्री बंकट स्वामी हे नारायणगडावर आले असताना, माणिकबाबांनी भगवानबाबांना बंकटस्वामींच्या स्वाधीन केले. बंकटस्वामींनी भगवानबाबांना आळंदी येथील वारकरी संस्थेत नेले. बंकटस्वामीच्या विचारांचा त्यांच्यावर प्रभाव पडला. तेथे त्यांनी संन्यास धर्म स्वीकारला.

**'नारायणगडावरील कार्य'**

आळंदीवरून नारायणगडावर भगवानबाबा परत आल्यानंतर त्यांच्या भेटीसाठी पंचक्रोशीतील भाविक येऊ लागले. त्याच सुमारास बंकटस्वामींच्या कीर्तन प्रसारासाठी वार्ता कानी पडल्याने त्यांनी प्रभावित होऊन समाजप्रबोधन करण्याचा निश्चय केला. भगवानबाबा भाविकांच्या आग्रहास्तव कीर्तन करू लागले. इ.स. १९१८ साली त्यांनी नारायणगड ते पंढरपूर अशी पायी दिंडी चालू केली. तेव्हापासून नारायणगडाला धाकटी पंढरी म्हणतात. इ.स. १९२७ साली नाथषष्ठीनिमित्त पैठणपर्यंत दिंडी चालू केली. पुढे सात दिवस अखंड हरिनाम सप्ताह सुरू केले. सप्ताहात भजन, कीर्तन, प्रवचन, कथाकथन, हरिनामजप व गाथापारायणे होत. पहिला अखंड हरिनाम सप्ताह इ.स. १९३४ साली पखालडोह या ठिकाणी केला. भगवानबाबा नारायणगडावर असेपर्यंत १७ हरिनाम सप्ताह झाले. भगवानबाबांचे गुरू नारायणगडाचे माणिकबाबा आजारी असल्याची बातमी भगवानबाबांना कळली तसे ताबडतोब ते नारायणगडावर आले. माणिकबाबांनी हात उंचावून भगवानबाबांना जवळ बोलावले. श्भगवान, तुझ्यावर गडाची आता सर्व जबाबदारी राहीलश असे सांगितले. ज्येष्ठ शु. १३ शके १८५९, (इ.स. १९३७) रोजी माणिकबाबांनी आपला देह ठेवला.भगवानबाबांवर लोभाचा आळ घेतल्यावर त्यांनी नारायणगड सोडला. खरवंडी येथील बाजीराव पाटील भगवानबाबांना धौम्यगडावर घेऊन गेले.

**'धौम्यगडाचा जीर्णोद्धार'**

गड उभारणीचे काम सुरू झाले, बाबा स्वत: वास्तुशास्त्रात निपुण होते. विशेष म्हणजे गडाचे संपूर्ण बांधणी पाषाणात असून लाकडाचा वापर न करता केलेले आहे. ओवऱ्यांसाठी नवगण राजुरी येथील राजूबाईच्या डोंगरावरून पाषाणखांडे आणले होते. सर्व पाषाणखांडे बैलगाडीने आणले गेले आणि त्यांनी चौकोनी चिऱ्यांचे रूप दिले गेले. गड उभारणीच्या कामाला आजूबाजूच्या परिसरातील भक्तगणांनी भरभरून मदत केली. स्त्रियांनी स्वत:चे दागदागिने, अलंकार, आभूषणे दिली आणि बांधकामासाठी निधी उपलब्ध झाला. प्रत्येक भक्तगण या कार्याला हातभार लावत होते. भक्तगणांनी घरून स्वत:च्या भाकरी—भाजी आणून, रात्रंदिवस गडाचे बांधकाम पार पाडले. पाहता पाहता भक्तीचा गड श्रीक्षेत्र भगवानगड ही अत्यंत विस्तीर्ण प्रचंड भव्य वास्तू नावारूपास आली. उत्कृष्ट वास्तुशिल्पकलेचा हा एक अलौकिक आविष्कार आहे. त्यांच्या संकल्पनेतूनन धौम्यगडाचा जीर्णोद्धाराची खऱ्या अर्थाने मुहूर्तमेढ ही रोवली गेली व भक्तीच्या गडाची स्थापना झाली. त्यानंतर खऱ्या अर्थाने धौम्यगडाचा कायापालट झाल्याचे पहावयास मिळाले. त्यांनी रस्त्यांच्या दुर्दशेवर प्रकाश टाकत रस्ता विकास करण्यावर भर दिला. भक्तांना एकत्र करून श्रमदानाने धौम्यगड ते पायथ्याच्या खरवंडी गाव रस्ता करण्याचे काम पूर्ण झाले.

इ.स. १९५८ मध्ये स्वामी सहजानंद सरस्वती, ह.भ.प. मामासाहेब दांडेकर आणि बाळासाहेब भारदे यांच्या हस्ते विठ्ठलाच्या मूर्तीची देवळात प्रतिष्ठापना

अशिक्षित, दीनदुबळ्या समाजाला नवचैतन्य दिले. दीनदुबळ्या समाजाला नवा आशेचा किरण दाखवला. समाजातील चुकीच्या, कालबाह्य प्रथा, अंधश्रद्धा, भोळ्या समजुती, अनिष्ट रूढी, अन्यायकारक परंपरा, अज्ञान, दुर्गुण, दोष, बुवाबाजी, गंडेदोर, अंगारा धुपार व जातीभेद वर्णव्यवस्था दूर करण्यासाठी त्यांनी आपले उभे आयुष्य वेचले. त्यांनी अनेकांना दुरूख, संकटे, रोग यांपासून मुक्त करून सन्मार्गाला लावले.

भगवानबाबा शैक्षणिक विकास व कृषिविकास करू इच्छिणार्यासाठी हितैषी होते. आयुष्याचा प्रत्येक दिवस सार्थकी लावण्याची पराकाष्ठा करणारा लोकशिक्षक व लोकनेता त्यांच्यात दडला होता. आपल्या कीर्तनाद्वारे तसेच कार्याच्या माध्यमातून जनकल्याणाची धुरा सांभाळत होते. जनसामान्यांवर उदात्त सुसंस्कार करण्याचे जणू व्रतच भगवानबाबांनी घेतले होते. त्यांनी जनकल्याणाचे व्रत स्वीकारले. प्रतिकूल परिस्थितीतही टीकेचे व निंदेचे प्रहार झेलत जनकल्याणाचे व्रत अखंडपणे विचलित न होता पूर्ण केले. जनकल्याणाची कामे सर्वांनी एकवटून केली पाहिजेत हा धडा समाजाला पटवून दिला. त्यांनी समाजातल्या घटकांचा उद्धार कसा होईल याविषयी समाजप्रबोधन केले. ओळख नसलेल्या सर्वसामान्यांना अस्तित्व मिळवून देणारे व माणसे घडविणारे ते चालते बोलते विद्यापीठ होते. सामाजिक परिवर्तनाचे ते शिल्पकार ठरले. समाजप्रबोधनाचे चळवळीतील त्यांचे योगदान महत्त्वपूर्ण होते. पुरोगामी विचारांचा व आक्रमक वृतीचा वारसा त्यांनी जपला.

**'शिक्षणप्रसाराचे कार्य'**

कोणत्याही दानापेक्षा ज्ञानदान हे सहस्रपटीने श्रेष्ठ आहे. हे दान जनतेस अर्पण करून या दानामुळे समाजाचा सर्वांगीण विकास होण्यास मदत होते. म्हणून मनुष्यजीवन दिशाहीन बनले असते. तत्कालीन समाजात शिक्षणाचे प्रमाण अत्यल्प होते. हे धोरण लक्षात घेऊन बाबांनी शिक्षणप्रसाराचे कार्य सुरू केले. भगवानबाबांनी खेडोपाडी हिंडून समाजात शिक्षणाचा प्रसार केला. ते शिक्षणाचा प्रसार होऊन समाज सुबुद्ध व्हावा अशी जनहिताची कळवळ जपणारे शिक्षणमहर्षी होते. भगवानबाबांनी सामान्य माणसाला अज्ञानापासून दूर करण्यासाठी जागोजागी शाळा, वसतिगृहे इत्यादी असंख्य बांधकामे केली व त्यांची नीट व्यवस्था लावून दिली. समाज सुधारण्यासाठी समाजाने शिकले पाहिजे यासाठी त्यांनी शाळा काढल्या. विद्यावाहिणीचे दूध कष्टकरी कामकरी यांच्या मुलांना मिळाले पाहिजे. याच उदात्त हेतूने भगवानगडावर शालेय शिक्षणाची सोय व्हावी म्हणून गडावर भगवान विद्यालयाची कोनशिला बसविली आहे. वाड्या, पाड्या, तांड्यांवरील मुले या ठिकाणी आज शिक्षण घेत आहेत. औरंगाबादला वसतिगृहाचे उद्घाटन तत्कालीन मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या हस्ते केले. औरंगाबादलाच भगवान होमिओपॅथी कॉलेजची स्थापना त्यांनी केली.

त्यांनी अनेक मुलींना शाळेत घातले. त्या मुली शिकल्या व त्यांनी आपले चांगले संसारही थाटले, हे दगडाबाईच्या प्रसंगावरून आपल्या लक्षात येते. या दगडाबाईनी त्यांच्या विषयीची गौरवगीते, भक्तिगीते व अभंग लिहिले. आपला वंजारी वेष घालूनच वारीला पंढरपूरला वारकऱ्यांबरोबर येण्याविषयीही भगवानबाबांनी तिला सांगितले. त्यांना आपल्या वारकरी परंपरेचा अभिमान होता. माझ्या दिंडीत असे वारकरी आहेत, याचा मला अभिमान वाटतो असे भगवानबाबा म्हणाले होते. ते वाक्य व तो विचार समाज परिवर्तनाच्या व सामाजिक अभिसरणाच्या दृष्टीने मोलाचे ठरले. याच दगडाबाईचा १९७४ साली महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी पुरस्कार देऊन सत्कार केला यामागे भगवानबाबांचीच प्रेरणा होती.

**'भगवानबाबांचे उपदेश'**

अमोघवाणीने केलेली भगवानबाबांची कीर्तने समाजाला तळागाळातून ढवळून काढणारी आणि म्हणून समाजाला योग्य दिशा देणारी ठसठशीत असत. कीर्तन म्हणजे भगवानबाबा व भगवानबाबा म्हणजे कीर्तन असे समीकरण या दशकांत रूढ झाले होते. 'कीर्तन म्हणजे भगवानबाबांचेच असे लोक गौरवाने म्हणत. अंतरूकरणापर्यंत पोहोचणारा कीर्तनकार असे त्यांचे वर्णन करतात. भगवानबाबा निर्मळ मनाचे, सचोटीचे, धैर्यवान, पारदर्शक, दृढनिश्चयी, दूरदृष्टी, स्पष्टवक्तेपणा, परखड वक्तृत्व, जनमनावर पकड, भागवत धर्म अस्मितेची रोकठोक विचार, विसंगतीवर मार्मिक भाष्य करणारे उत्तम वक्ते दशश्रेष्ठ व्यक्तिमत्त्व होते. प्रेमवात्सल्यता,

केली. गडाचे उद्घाटन मुंबई प्रांताचे तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते १ मे १९५८ रोजी झाले. यावेळी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण बोलताना म्हणाले की, ''धर्मरक्षणासाठी भगवानबाबांनी भक्तांना एकत्र करून शास्त्राच्या आधाराने भक्तीचा गड उभारण्याचे काम केले आहे. आजपासून धौम्यगड हा भगवानगड म्हणून ओळखला जावा.'' तेव्हापासून धौम्यगडाचे नाव भगवानगड असे पडले. याचवेळेस बाबांच्या संकल्पनेतून भगवान विद्यालयाने आकार घेतला. शालेय शिक्षणाची सोय व्हावी म्हणून गडावर भगवान विद्यालयाची कोनशिला बसविली आहे. वाड्या, पाड्या, तांड्यांवरील मुले आज या ठिकाणी शिक्षण घेत आहेत.

**व्यक्तिमत्त्व'**

भगवानबाबांची वेशभूषा तत्कालीन जनसामान्य लोकांसारखीच होती. त्यांची राहणी साधी व विचारसरणी उच्च होती. श्री संत भगवानबाबा पांढरे शुभ्र साधे धोतर, पांढरा शुभ्र सदरा, पांढरा फेटा वापरत. कधी गुडघ्यापर्यंत पोचणारा कोट घालत. रुंद, भव्य कपाळ, कपाळावर गंध, गळ्यात तुळशीमाळ हाच त्यांचा थाट होता. रुबाबदार मिशा, भव्य देहयष्टी, उंचेपुरे, तेजस्वी कांती व गौरवर्ण यांमुळे ते भारदस्त वाटत. हातांत काठी, पायात चप्पल किंवा बूट असे. ते शिस्तीचे तसेच उत्तम मनुष्यपारखी होते.

**'अहिंसावादाची शिकवण'**

जिवंत प्राण्यांचा बळी देणे, धार्मिक भावनेने हा धर्म नसून महान अधर्म आहे. मराठवाड्यात देवतांपुढे बोकडांची हत्या करण्याची रूढी—परंपरा त्यांनी बंद पाडली आणि समाजाला अहिंसावादाची शिकवण दिली. माजलगाव, पाथर्डी, धारूर, केज, शेगाव यांसह अनेक गावांतील पशुहत्या त्यांनी बंद केली. माळ घालणाऱ्याला मांसाहार करशील का? असा प्रश्न विचारून त्याचं नकारात्मक उत्तर आल्यावरच ते त्याला माळ घालीत. वंजारी समाजातील मांस खाण्याच्या प्रथेला भगवानबाबांनी विरोध केला. आजही वंजारी समाजात माताभगिनी त्यांचे श्रद्धेने पालन करतात. गोहत्याबंदीची भावना त्यांनी रुजविली व त्या काळातील रूढी—परंपरेला छेद दिला. देवाची खरी भक्ती समजावण्यासाठी आपले आयुष्य जनसेवेला अर्पिले.

**धर्मनिरपेक्षतेची शिकवण**

भगवानबाबापुढे सर्व लोक समान होते. भगवानबाबा हे मानवतेचे मोठे पुरस्कर्ते प्रतीक होते. त्यांनी धर्म, सहिष्णुता, धर्मनिरपेक्षतेची शिकवण दिली. संतभगवानबाबांनीही आयुष्यभर याच भूमिकांचा पुरस्कार केला. मानवतेची ज्योत मनामनांत तेवत ठेवण्याचे कार्य त्यांनी आयुष्यभर केले. समाजव्यवस्था सुध ारण्यासाठी कोणत्याही फळाची अपेक्षा न ठेवता सातत्याने सर्वसामान्यांसाठी अहोरात्र काम केले. भगवानबाबांचे नाव इतके लोकप्रिय झाले की ते आपलेच संत आहेत असे विविध धर्मांच्या आणि पंथांच्या लोकांना वाटे. त्यांच्या भाविकांमध्ये अनेक जाती, धर्म आणि पंथांचे लोक आहेत. वेगवेगळ्या धर्मपंथातील लोकांचा त्यांचा भक्त—परिवार वाढत चालला. त्यांनी सामाजिक तेढ निर्माण झालेल्या चिंचाळा गावात दोन समाजांत समेट घडवून आणली. एका गावात दैवताच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करायची होती, तेथे मुस्लिम मिस्त्री असल्यामुळे संयोजकांनी त्याला विरोध केला, तो भगवानबाबांनी अमान्य करत त्या मुस्लिम मिस्त्रीलाच ते काम करू दिले. जातपात, उच्चनीचता, जातीभेद, धर्मभेद व पंथभेद दूर करण्यासाठी त्यांनी आटोकाट प्रयत्न केले. ते धर्मप्रबोधनाचे उद्गाते ठरले. समाजात प्रामाणिकपणा, नीतिमत्ता, आदरभाव, एकदुसर्यबद्दल प्रेमाची भावना, दया, क्षमा, शांतता, त्यागी वृत्ती आणि भक्ती या ज्या संकल्पना आहेत, त्याचा खोलवर विचार केल्यास ही धर्मनिरपेक्षतेची शिकवण भगवानबाबांनी बहाल केली.

**'समाजप्रबोधनाचे कार्य'**

माणसाची सेवा हीच ईश्वराची सेवा आहे. तसेच सर्वांमध्ये ज्यांना भगवंताचा साक्षात्कार झालेला आहे असे स्पष्ट सांगणारे, कीर्तनातून देव दगडात नसून तो माणसांत आहे हे भगवानबाबांनी सर्वसामान्यांच्या मनावर ठसविण्याचा प्रयत्न केला. खरे तत्त्वज्ञान बहुजन समाजापुढे आल्याने त्यांच्यात अज्ञान, अंधश्रद्धा, अशिक्षितपणामुळे खरा देव समजला. बहुजन समाजातील अनेक वाईट चालिरीती कीर्तनाच्या माध यमातून पूर्णपणे बंद करण्याचा प्रयत्न केला आणि समाजाला एक रोकडा धर्म दिला. तिच खरी भक्ती आणि देवपूजा सांगितली. भगवानबाबांनी अत्यंत

कोमलता, सहनशीलता, करुणा, त्यागीवृत्ती, समर्पणता, सहिष्णुता, रसाळ, निर्भयता, प्रासादिकता आदी भावना भगवानबाबांच्या कीर्तनात प्रकर्षाने दिसून येत. तत्त्वचिंतनता, सोपेपणा, तर्कशुद्धता, सदाचारी, परिपक्व, मनमोकळी, विचारी, स्पष्टवक्ती, समृद्ध शब्दरचना, नेटकी मांडणी, दिलदार शैली, विचारांची रेखीव प्रकटीकरण, वैभवशाली शब्दांची उधळण अशा भाषाशैलीत कीर्तने करत. त्यांच्या कीर्तनात भावसामर्थ्य ओतप्रोत भरलेले दिसत असे. त्यांचे कीर्तन सर्वसामान्य माणसांच्या हृदयाला जाऊन भिडत असे. त्यांच्या कीर्तनाने भाविक भारावले जात.जवळपास चार दशके त्यांनी कीर्तनद्वारे तमाम समाजाच्या हृदयावर राज्य केले. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील सच्चेपणामुळे त्यांच्या कीर्तनाला गर्दी होत गेली. भगवानबाबांनी पहिला अखंड हरिनाम सप्ताह इ.स.१९३४ साली पखालडोह या ठिकाणी केला. या अखंड हरिनाम सप्ताहास लाखो लोकांनी गर्दी केली होती. या सप्ताहापासूनच भगवानबाबा आणि कीर्तनासाठी माणसांची प्रचंड गर्दी यांच्यामध्ये हे इथे जुळलेले गणित फिस्कटले नाही. अशी विलक्षण लोकप्रियता असलेले भगवानबाबा हे एक संस्थानच होते.

संत भगवानबाबा कीर्तनात नेहमी उपदेश साधे, सोपे सांगत. सत्कर्म, सत्याचरण, परोपकार, न्याय, प्रीती आणि कर्तव्यकर्म यांचे पालन करा, कर्ज काढून व प्रपंचाकडे दुर्लक्ष करून भगवंत भेटीसाठी तीर्थक्षेत्रास जाणे ही सर्वात मोठी चूक आहे. गळ्यात तुळशीमाळ घाला, भगवंताचे चिंतन करा, परमार्थ वाढवा, मुलांना चांगले शिक्षण द्या, चोरी करू नका, उपाशी राहा पण कर्ज काढू नका, व्यसनांच्या आहारी जाऊ नका, लाचार बनू नका, पशुहत्या करू नका, हिंसा करू नका, जातिभेद व अस्पृश्यता मानू नका असे रोखठोकपणे जनतेला सांगणारे समाजउद्धारक कर्मयोगी होते. त्यांनी जनसेवा हीच भगवंतची सेवा आहे म्हणून माणसाने गोरगरीबांना, दीनदलित, गरीब, दरिद्री माणसांशी माणसांसारखे वागावे तथा मुक्या प्राण्यांवर दया दाखवावी इत्यादी गोष्टींची शिकवण दिली. हाच संदेश प्रत्येक घराघरात पोहचवण्याचे महान कार्य केले आहे. त्यांचे तत्त्वज्ञान प्रत्येक मानवाला माणसांसारखे जगण्यास भाग पाडले. त्यांच्या विचाराने समाजात फार मोठे परिवर्तन झाले. संत भगवानबाबांनी त्यांच्या संपूर्ण जीवनकाळात आपल्या वागण्यातून महाराष्ट्राला समता, एकता, बंधुत्वाची व प्रामुख्याने शांततेची शिकवण दिली होती.

अनेक वर्षे बाबांनी कीर्तनकारणे भ्रमंती सुरू असताना त्यांनी समाजाचे जवळून निरीक्षण केले, अभ्यास केला आणि समाजाचे विदारक चित्र दिसल्यावर ते बाबांनी कीर्तनाद्वारे समाजप्रबोधन केले. समाजातील अनेक वाईट प्रथा, चालीरीती बंद करण्याचा प्रयत्न केला. अंधरूकारातून प्रकाशाकडे जाणारा मार्ग बाबांनी सांगितला. इ.स. १९६५ च्या प्रारंभी भगवानबाबांची प्रकृती खालावत चालली होती. अनेक दिवसांपासून त्यांच्या प्रकृतीत चढ उतार होत होते, त्यांची प्रकृती आणखी खालावली व प्रकृती अस्वास्थ्यामुळे भगवानबाबांना रुबी हॉल क्लिनिक पुणे येथे औषध उपचारंकरिता दाखल केले. भगवानबाबा हृदयविकाराने आजारी असताना उपचार करण्यासाठी रुबी हॉल क्लिनिक इस्पितळातील डॉ.के. बी. ग्रँट व त्यांची टीम दाखल झाली. त्यांच्या विनंतीला मान देऊन नाथा मिसाळ हा ज्ञानेश्वरीचे पारायण करत असे. तेथेच सोमवार, दि. १८ जानेवारी १९६५ रोजी रात्री एक वाजता वयाच्या ६९ व्या वर्षी समाधिस्थ होऊन जगाचा निरोप घेतला. तीन वेळा 'पुंडलीक वरदा हरी विठ्ठल, श्री ज्ञानदेव तुकाराम, पंढरीनाथ महाराज की जय, जगद्गुरू तुकाराम महाराज की जय, शान्तिब्रह्म श्री एकनाथमहाराज की जय' हा जयघोष करून आत्मा पांडुरंगचरणी विलीन केला व देह ठेवला. लाखोंचा पोशिंदा अनंताकडे झेपावला. त्या भूमीला धरणीकंपसारखा भासला.

१९१८ च्या दशकामध्ये तमाम समाजाच्या ह्दयाला हात घालत जवळपास चार दशके महाराष्ट्रच नव्हे तर देशभर पसरलेली धर्मचळवळ शांत झाली. भागवत धर्मात कधीही भरून न निघणारी पोकळी निर्माण झाली. महाराष्ट्राने उत्तुंग कीर्तनकार व्यक्तिमत्त्व हरपल्याने शोककळा पसरली. अटकेपार जावून डौलाने फडफडणारा जरीपटका स्थंबावरून अनंताकडे झेपावला. भगवानबाबा हे भागवत धर्मप्रसाराचे कार्यकारणातले एक पर्व होते आणि त्या पर्वाचो सांगता झाली. भगवानबाबा नावाच्या एका पर्वाचा अस्त झाला. एका युगाचा अंत झाला. एक वादळ शांत झाले. झंझावात

विरून गेला. शतकानुशतके वाट पहावी लागलेला भागवत धर्माच्या सूर्याच्या अंत झाला. वारकरी संप्रदायाचा आधारवड गेला. भागवत धर्माचा वटवृक्ष उन्मळून पडला. महाराष्ट्राच्या वारकरी संप्रदायातील एक अध्याय संपला. शुन्यातून सामर्थ्य निर्माण करणारा कुशल संघटक तारा हरपला. सामान्य माणसासाठी झटणारा एक सिंह गमावला. कीर्तनातून निघणारे सूर पांडुरंगचरणी विलीन केला होता. तब्बल पंचेचाळीस वर्षे वा त्याहूनही अधिकचा प्रदीर्घकाळ महाराष्ट्रात ज्या भगवानगडावर त्यांनी कीर्तने गाजविले ते सुन्न पडले. बाबांच्या निमित्ताने जनतेला त्यांचा 'देव' गवसला होता. त्यांची शैली, भाषा, व्यक्तिमत्त्व, बाणा हा पुन्हा होणे नाही. प्रखर अलौकिक भागवत भक्तीचा विचार देणार्या एका विचारसूर्याचा अस्त झाला. सूर्य मावळतीला जाताना कधी नाही इतका गहिवरला.

योगियाची संपदा... त्याग आणि शांती प्रसन्न आचार्य... उभयलोकी किर्तीसोहळामान सम्राट... ईश्वर विभूती... प्रकाशमान... ब्रह्मचारीरूप गुरुवर्य... सर्वश्री. .. वैराग्यमुर्ती... समाजाला ज्ञानरूपी प्रकाश देणारे... समाजाचे चंद्रसूर्य समजले जाणारे... प्रबोधनाचा महामेरु. .. भक्तिरसाचा सागर... मायेचा पाझर... पंढरीचा अखंड वारकरी... तुळशीच्या माळेने क्रांतीची ज्योत पेटविणारे. .. परोपकारी... भक्तीचा गड उभारणारे... भजन—कीर्तन, प्रवचनाची गंगा... शुद्ध आचरणाचा पितामह... स्नेहप्रेमाचे सम्राट...परमविठ्ठलभक्त ... ऐश्वर्यसंपन्न संत... ह.भ. प. श्री भगवानबाबांचे कार्य अलौकिक होते. समाजात झालेले वैचारिक प्रदूषण भगवानबाबांनी कमी केले होते. अधरूपतित समाजाला सन्मार्गावर आणले होते. असा संत पुन्हा होणे नाही.

**संदर्भ ग्रंथ सूची**

१) संतभगवानबाबा जीवन व कार्य—श्री.के. टी.तांदळे,गोपिका प्रकाशन.

२) संताची अमृतवाणी—श्री.एच.ए.भावे,वरदा प्रकाशन.

३) संतभगवानबाबा यांचे चरित्र— रवी फड.

४) महाराष्ट्रीय संतमंडळाचे ऐतिहासिक कार्य— सुंठणकर.बा.र.पॉप्युलर बुक डेपो मुंबई.

30

# प्राचीन मराठीवाङ्मयातील चरित्र : आशयसूत्र व वाटचाल — वाङ्मयीन शोध

डॉ. आप्पा दत्तू माने
मराठी विभाग प्रमुख
महात्मा फुले नुतन महाविद्यालय मिरजगाव
ता. कर्जत जि. अहमदनगर

**********

**प्रस्तावना —**

मानवी भावनांचा अर्थसंपन्न अविष्कार म्हणजे भाषा. याच भाषिक व्यवस्थेतून मानवाने वाङ्मयीन कलाकृतीची निर्मिती केली. सहज, उत्कट भावनांचा कलात्मक भाषिक अविष्कार सृजनशीलपणे घडतो तेव्हा त्यातून साहित्याची निर्मिती होते. उदा. कविता, कथा, कादंबरी नाटक, चरित्र—आत्मचरित्र इत्यादी प्रकार त्या साहित्याचे स्वरूपानुसार कल्पिलेले आहेत. चरित्र—आत्मचरित्र मानवी जीवनातील जीवन प्रवासाचा सृजनशील अविष्कार आहे. काळाबरोबर मानवी शरीर—मन याद्वारे अनुभवसंपन्न केलेला सुखदु:खाचा प्रवास पुनरू प्रत्ययाद्वारे, तटस्थपणे मांडणे म्हणजे चरित्र—आत्मचरित्र होय.

**गृहितके —**

१ . चरित्र वाङ्मयामध्ये चरित्रनायकाच्या जीवन प्रवासाचा कलात्मक शोध असतो.

२. चरित्र वाङ्मय म्हणजे समाजमनावरील प्रभावी व्यक्तिमत्वाचे विचारविश्व, अनुभवविश्व असते.

३. चरित्र वाङ्मयम्हणजे व्यक्तीचा संपन्न जीवन अनुभव हा जीवनानुभव नव्या पिढीला सांगणे.

**संशोधन पद्धती —**

प्रस्तुत शोधनिबंधाच्या अभ्यासासाठी ऐतिहासिक, भाषाविज्ञान आणि विश्लेषणात्मक संशोधनपद्धतीचा उपयोग संशोधनासाठी करण्यात आलेला आहे.